अकोला जिल्हा कारागृहाचे आतील रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करणे या कामाचे येणाऱ्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः जेएलएम-१३१४/प्र.क्र.८/तुरुंग-२

जागतिक व्यापार केंद्र, सेंटर नं. १, ३० वा मजला,
कफ परेड, मुंबई-४०० ००५
दिनांक: ११ जुलै, २०१४.

वाचा

१) अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र.बीएलडी/अजिका/आतीरस्ता/खडी/४७७/कक्ष-६(३), दि.१०.०१.२०१४.

प्रस्तावना

अकोला जिल्हा कारागृहाच्या आतील रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग बऱ्याच जागी खडबडीत झाला असुन, जागोजागी खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे सदर कारागृहाचे आतील परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे गरजेचे आहे. या अंतर्गत ०.७७५ कि.मी. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरणे, डांबरी थर देणे, आस्फाल्ट कॉंक्रीट करणे, कठीण मुरमाने साईड पट्ट्या भरणे इत्यादी बाबी विचारात घेण्यात आल्या आहेत. सदर कामाचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांनी रुपये २२,१७,८८५/- इतक्या खर्चाचे तपासून व साक्षांकीत केलेले अंदाजपत्रके अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनाच्या प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केली आहेत. त्यास अनुसरुन याद्वारे शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

शासन निर्णय

अकोला जिल्हा कारागृहाच्या परिसरात आतील रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करण्याकरिता छाननीअंती एकूण रुपये २१,९६,७६२/- (रुपये एकविस लक्ष शहाण्णव हजार सातशे बासष्ट फक्त) इतक्या अंदाजपत्रकास या शासन निर्णयाद्वारे शासन प्रशासकीय मान्यता देत आहे.

सदर अंदाजपत्रकाची सार्वजनिक बांधकाम विभागाने तपासणी केली असून सदर अंदाजपत्रक सन २०१३-१४ च्या दरसूचीवर आधारित आहे. अंदाजपत्रकात ४ टक्के सेंटेज चार्जेसची तरतूद करण्यात आली आहे.

यासाठी होणारा खर्च मागणी क्र.एच-८, ४०५९-सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, १०१ बांधकाम (००) (०) तुरुंग, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना या लेखाशीर्षाखाली उपलब्ध होणाऱ्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहमतीने व वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र १०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम, दि.१५/०५/२००९ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उप विभाग-पाच,अनुक्रमांक-३, नियम १३४ अन्वये प्रशासनिक विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०६०४१६२६५७७०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra Ishwar Giri

Digitally signed by Ravindra Ishwar Giri
DN: CN = Ravindra Ishwar Giri, C = IN, S = maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HOME
Date: 2014.07.11 15:17:26 +05'30'

(र. ई. गिरी)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१. अपर पोलीस महासंचालक व पोलीस महानिरिक्षक (कारागृह),महाराष्ट्र राज्य,पुणे,
२. कारागृह उपमहानिरीक्षक (मुख्यालय),महाराष्ट्र राज्य,पुणे,
३. कारागृह उपमहानिरीक्षक (पूर्व विभाग), नागपूर,
४. अधीक्षक, अकोला जिल्हा कारागृह, अकोला,
५. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र राज्य, नागपूर,
६. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा),महाराष्ट्र राज्य, नागपूर,
७. कोषागार अधिकारी, अकोला,
८. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला,
९. सार्वजनिक बांधकाम विभाग, (इमारती-२) मंत्रालय,मुंबई-३२,
१०. अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर नं. १, ११ वा मजला, मुंबई-५,
११. निवडनस्ती, (तुरुंग-२)